# राशिभविष्य - एप्रिल, २०११

**दादा दामले (dadadamle@hotmail.com)**

**(१) मेष -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचे एकूण ग्रहमान पूर्णपणे प्रतिकुल असेच असणार आहे. केवळ शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील. सतत मनस्ताप देणाऱ्या घटनांमुळेच शारीरिक अनारोग्य होण्याची शक्यता दिसते. गैरसमजुतीने वाद, भांडणे होणे, जुनी दबलेली प्रकरणे पुन्हा उकरली जाऊन त्यांचा असह्य त्रास होणे, मन सतत अस्वस्थ असणे, त्यामुळे काही मंडळींचा रक्तदाब वाढणे, हाती घेतलेल्या कार्यात अडथळे, अडचणी येणे, आर्थिक चिंता निर्माण होणे अशापैकी त्रास सहन करावे लागण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत मन शांत ठेवून व सहनशील बनून तसेच नम्रतचे आचरण करूनच प्रतिकुलतेशी मुकाबला करणेच सुखाचे होईल. काळ सध्या अनुकुल नाही याची सतत जाणीव ठेवूनच नवीन असे काहीही करण्याचा प्रयत्न करू नये. मात्र अध्यात्म, उपासना आदिंची मनापासून आवड असेल तर त्यात प्रगती होण्याची शक्यता दिसते. त्यामुळे थोडी मन:शांतीही मिळू शकेल. तसेच सामाजिक कार्याची आवड असणारांना काळ अनुकुल होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व मारुतीची उपासना अनुकुल होईल. लवकरच प्रतिकुल काळ विरून जाणार आहे असा विचार करून भावी अनुकुल काळात साध्य करावयाच्या गोष्टींच्या योजना आखण्यास हरकत नाही.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींना महिन्याच्या पूर्वार्धात रवि अनुकुल असून शुक्र प्रतिकुल असेल; तर महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह प्रतिकुल व शुक्र ग्रह अनुकुल असणार आहे. इतर सर्व ग्रह बऱ्याच प्रमाणात अनुकुल असणार आहेत. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होणार आहे. स्वतंत्र व्यापार-व्यवसाय असणारांना अस्थिर परिस्थितीचा अनुभव येणे शक्य आहे. पण या राशीच्या लाभस्थानातील गुरु-हर्षल युतीमुळे व महिन्याच्या उत्तरार्धात शुक्राच्या अनुकुलतेमुळे लाभदायक परिस्थिती निर्माण होईल. सामान्य नोकरी करत असणारांना कष्ट-परिश्रम करूनच अपेक्षित अर्थलाभ मिळवावा लागेल. काहींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होण्याची शक्यता आहे. वकिली, अकौण्टन्सी, शास्त्रीय संशोधन, कलाक्षेत्र अशा कार्यक्षेत्रांत कार्यरत असणारांना काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल. मात्र मित्रांशी, सहकाऱ्यांशी भांडणे होणार नाहीत, याची काळजी घ्यावी लागेल. वाममार्ग धन सहज मिळण्याची शक्यता असली तरी तो मोह टाळाच. नपेक्षा होत्याचे नव्हते होण्याची शक्यताच अधिक दिसते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात अनारोग्य होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धातच कौटुंबिक, वैवाहिक जीवनात अधिक सुखसमाधान लाभेल. विद्यार्थ्यांना अपेक्षित प्रगती साधण्यास व अपेक्षित यश मिळण्यास काळ अनुकुल होईल.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळींनी कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभावे यासाठी कोणत्याही कारणाने वाद, भांडणे होणार नाहीत याची काळजी घ्यावी. असे घडले व थोडे आध्यात्मिक उपासनेकडे मन वळवलेत तर खूपच सुखाचे होईल. त्यासाठी काळ अनुकुल आहे. या राशीच्या काहींना सूचक स्वप्ने पडतील; तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. काहींना गुरुकृपा लाभून कीर्ती-प्रसिद्धीचे योगही संभवतात. जन्मकुंडलीतील योगानुसार अशा प्रकारच्या घटना घडतील. गुरु-हर्षल योगामुळे शास्त्रीय संशोधन, चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना अनपेक्षित लाभदायक घटना घडत

असल्याचा अनुभव येईल.  तसेच राजकारणात सहभाग असणारांना प्रगती व अर्थलाभ या दृष्टीने काळ अनुकुल होईल.  नोकरीत वरिष्ठांकडून शाबासकी मिळू शकेल. या राशीच्या काही मंडळींना नवे कार्यक्षेत्र मिळू शकेल. सामान्य नोकरी-व्यवसाय असणारांना मात्र कामाचा असह्य ताण व विरोध सहन करावा लागेलसे दिसते. स्वतंत्र व्यापार-व्यवसाय असणारांच्या कार्यक्षेत्रात अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. शुक्र ग्रह महिन्याच्या पूर्वार्धातच अनुकुल असणार आहे. त्यामुळे आपल्या कार्यक्षेत्रात यश व प्रगती साधून मानसिक सुखानंद संतोष मिळविण्याचा प्रयत्न महिन्याच्या पूर्वार्धातच अधिक प्रमाणात करा.  मन व बुद्धी विकृत होणार नाही याची काळजी घेतली तर सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राहील व स्वास्थ्य लाभेल.

**(४) कर्क -**   या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात गुरु-शुक्र हे दोन्ही शुभ ग्रह अतिशय अनुकुल असणार असून विशेष करून महिन्याच्या उत्तरार्धात  गुरुकृपा, थोरकृपा, सात्विक सुखशांती देण्यास अनुकुल होतील. तसेच मनोनुकुल घटनाही घडतील. मात्र महिन्याच्या पूर्वार्धात रवि ग्रह प्रतिकुल असणार आहे. त्यामुळे नियोजित कार्यात अडथळे, अपयश येणे संभवते. तसेच कौटुंबिक सुख व गृहसौख्यातही बाधा येण्याची शक्यता आहे. जपा.  गुरु-हर्षल योगामुळे शास्त्रीय संशोधन, गूढ संशोधन कार्यात प्रगती व यश साधणे शक्य होईल. काहींना दूरच्या किंवा परदेश प्रवासाचे योग येतील.  पण जलभय असल्याने जलप्रवास मात्र करू नका.  या राशीच्या युवकांना नवे कार्यक्षेत्र किंवा मनासारखी उत्तम नोकरी मिळू शकेल.  वकिली व्यवसाय व लोखंडी सामानाचे व्यापारी यांना काळ लाभदायक होईल. पण एखाद्या भावंडाविषयी चिंता निर्माण होईल. परधर्मीयांशी नोकरी-व्यवसायानिमित्त संबंध असणारांना काळ लाभदायक होईल. पण इतरांना महिन्याचा पूर्वार्ध अधिक प्रतिकुल होईल. उत्तरार्धात परिस्थिती सुधारेल. स्वभाव थोडा लहरी होणे संभवते. त्याला ब्रेक लावाच. महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या शुक्रामुळे या राशीच्या काही भाग्यवंत मंडळींना भूमिलाभ वा धनलाभ हो ऊन भरभराट होईल; तर काहींना मान, प्रतिष्ठा प्राप्त होईल. एकंदरीत पाहता या महिन्याचा काळ या राशीच्या मंडळींना अनुकुलच असेल.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळींना अद्याप शनिदेवांच्या साडेसातीचा साडेसात महिन्यांचा काळ सहन करावयाचा आहे. तो सर्व काळ मनावर ताबा ठेवून, सहनशील बनून, तोंडाला कुलूप लावून व नम्रतेचे आचरण करून व्यतीत कराल तर सर्व काही सुखाचेच होईल. " महापुरे झाडे जाती, तेथे लव्हाळे वाचती " हे तुकारामाचे वचन सतत ध्यानी ठेवून आचरण करा. काहीही नुकसान होणार नाही. शनिदेवांच्या सत्त्वपरीक्षेत पास झालात की शनिदेव भरभरून सर्व काही देतील. वरीलप्रमाणे आचरण झाले तरच सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राहील.तसेच कौटुंबिक सुखात, वैवाहिक जीवनातील सुखात व सतंतिसुखात येणाऱ्या बाधा सहज सहन करू शकाल. तरीही या राशीच्या काहींना उष्णताविकारांचा त्रास होणे संभवते.  सर्व प्रकारचे अपघातभय असल्याने सतत जागरूक अवस्थेत आचरण करा. काळ प्रतिकुल असल्याने नवीन असे काहीही करण्याचे धाडस करू नका. आहे तेच व्यवस्थित सांभाळता आले तरी खूपच सुखाचे होईल. पण भावी अनुकुल काळात साध्य करावयाच्या गोष्टींची पूर्वतयारी करण्यास हरकत नाही. त्या दृष्टीने प्रयत्न कराच.  अशाही प्रतिकुल काळात या राशीच्या ज्या मंडळींच्या जन्मकुंडलीत योग असतील  अशांना अचानक धनलाभ वा वारसा धन मिळण्याची शक्यता मात्र दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात शुक्रामुळे या राशीच्या काही भाग्यवंतांना भूमिलाभ,

धनलाभ वा अन्य प्रकारचे लाभ मिळण्याची शक्यता आहे. हनुमानाची उपासना अनुकुल होईल.

**(६) कन्या -** शनिदेवांच्या साडेसातीचा काळ आहे, याची जाणीव ठेवूनच या राशीच्या मंडळींनी सतत जागरूक अवस्थेत आचरण करणे अगत्याचे होईल. शनिमुळे अनारोग्य व गहरे नैराश्य येणे संभवते. . राहूमुळे गृहसौख्यात बाधा येण्याची शक्यता दिसते. जीवनसाथीचे अनारोग्य, मतभेद, वाद अशापैकी कारणाने वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा येऊ शकेल. तरीही गुरुमुळे या राशीच्या विवाहेच्छ् युवकयुवतींचे विवाह ठरण्याची शक्यता दिसते. किंवा प्रेमसंबंध वा स्नेहसंबंध निर्माण होतील. महिन्याच्या उत्तरार्धात वैवाहिक जीवनात तणाव निर्माण होणार नाहीत याची काळजी घ्या. तसेच भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी संशय व गैरसमजुतीने भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. तसेच स्वतःचे व जीवनसाथीचे अनारोग्य, संततीपैकी कोणाचे आजारपण, नोकरीत वरिष्ठांशी मतभेद होणे संभवते. जपा. या राशीच्या मंडळींनी सध्या नवीन व्यवसाय वा व्यापार करण्याच्या भानगडीत पडू नये. आहे ती नोकरीच व्यवस्थित करावी, हे उत्तम. कोर्टप्रकरणे असतील तर त्यात यश मिळण्याची शक्यता नाही. त्यामुळे ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करणेच अनुकुल होईल. या राशीच्या काही मंडळींना उगीचच काही तरी आजार झाल्याची भावना व काल्पनिक चिंता त्रस्त करतील. आर्थिक फ़सवणूक होणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर हनुमान उपासना अनुकुल होईल व मनोबल देईल.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळींना शनिदेवांच्या साडेसातीची प्रचीती येत असेलच. स्वतःचे व जीवनसाथीचे आरोग्य उत्तम राहिले तरच वैवाहिक जीवनातील बाधा बरीच कमी होईल. तरीही काही ना काही कारणाने मनाविरुद्ध घटना घडून नैराश्य येणे संभवते. सध्या या राशीच्या मंडळींचे मन अत्यंत भावनाशील झाले असल्यामुळे कुटुंबातील कोणाचे नोकरीतील बदलीमुळे स्थलांतर झाल्यास किंवा थोडेही मनाविरुद्ध काही घडल्यास या मंडळींना लगेच गहरे नैराश्य येऊ शकेल. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या राहूमुळे काहीही कारणाने भावंडसुखात बाधा येण्याची शक्यता दिसते. जपा. पण हाच राहू नोकरी-व्यवसायातील प्रगतीस व यशास अनुकुल होईल. " वरून कीर्तन, आतून तमाशा " अशा प्रकारचे आचरण होणार नाही याची काळजी घ्या. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या मंगळ-हर्षलमुळे मुदतीचे ताप, उष्णतेचे आजार, मेंदूविकार, रक्तविकार, हृदयविकार, पोटाचे विकार, मूत्राशयविकार अशापैकी आजार बळावण्याची शक्यता दिसते. जपा. तरीही रवि-गुरुमुळे शारीरिक आरोग्य मर्यादेपलीकडे बिघडणार नाही असे वाटते. महिन्याच्या पूर्वार्धात शुक्रामुळे कौटुंबिक सुखसमाधान मिळू शकेल, अध्यात्म, उपासना यांची गोडी असणारांना साधनेद्वारे सात्विक सुखशांती मिळू शकेल. प्रिय दैवताची व हनुमानाची उपासना अनुकुल होईल.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ अनुकुल/प्रतिकुल असे संमिश्र अनुभव देणारा असाच असणार आहे. कौटुंबिक सुख, संततिसुख व महिन्याच्या उत्तरार्धात वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. ऐन परीक्षेचे वेळी येणारे मुलांचे आजारपण, त्यांचे अयोग्य आचरण यांमुळे संततिसुखात थोडी बाधा येणे शक्य आहे. राहूमुळे कौटुंबिक सुखात तर केतुमुळे अनारोग्य, अपघात अशापैकी कारणाने वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. नेपचूनमुळे घरगुती बाबतीत गैरसमज, घोटाळे यांमुळे अपेक्षित गृहसौख्य लाभणे कठिण दिसते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी विशेष जपावे. केवळ गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे परिस्थिती अटोक्यात

राहील व काही मनोनुकुल घटना घडून सुखानंदसंतोष लाभेल. या राशीच्या काही मंडळींना रक्तविकार, त्वचारोग, मुख-दंत रोग अशापैकी आजार त्रस्त करतील. जपा. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस व परीक्षेतील अपेक्षित यशास काळ अनुकुल आहे. तसेच उच्च बौद्धिक चिकित्सक विषयातील संशोधनास काळ अनुकुल व यशदायक असा सिद्ध होईल. त्याचप्रमाणे कलाक्षेत्रातील मंडळींनाही आपल्या कलाविष्कारास काळ अनुकुल, यशदायक व लाभदायक असाच असेल. नोकरी-व्यवसायास महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे अपेक्षित अर्थलाभ होईल. मनोनुकुल घटना घडतील व सर्व काही ठीक होईल.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचे एकूण ग्रहमान फ़ारसे अनुकुल नाही असेच म्हणावे लागते. त्यामुळे या राशीच्या मंडळींनी सतत मनावर ताबा ठेवून व सहनशील बनून नम्रतेचे आचरण केल्यास त्यांना शुभ ग्रहांच्या अनुकुलतेचे लाभ घेणे व सुखसमाधान मिळवणे सहज शक्य होईल. या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींचे मन अत्यंत भावनाशील, चंचल व अस्वस्थ राहण्याची दाट शक्यता आहे. अशा परिस्थितीत मनाचा क्षोभ होणाऱ्या घटना घडल्यास मनावर ताबा ठेवणे कठिण जाईल. तरीही मनाचा तोल सावरण्यावरच तुम्हांस तुमच्या सुखदु:खाचे परिणाम सहन करावे लागणार आहेत. कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करा. या राशीच्या काहींना रक्तविकार, वातविकार यांपैकी कशाचा तरी त्रास सहन करावा लागेलसे दिसते. महिन्याच्या पूर्वार्धात शुक्राच्या अनुकुलतेने या राशीच्या काहींना भूमिलाभ तर काहींना धनलाभ होण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या शेतीव्यवसाय असणारांना काळ लाभदायक होईल. व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. या राशीच्या सुखस्थानी असलेले हर्षल-मंगळ बुद्धी विकृत करून कौटुंबिक सुखसमाधानात बाधा निर्माण करण्याचा प्रयत्न करतील. नातेवाईक मंडळीकडून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचे ग्रहमान खूपच अनुकुल आहे असे म्हणावे लागेल. केवळ रवि ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल असेल व राहू वैवाहिक जीवनातील सुखास बाधक होईल इतकेच. गुरु-शुक्र हे शुभ ग्रह अनुकुल असल्यामुळेच सर्व काही मनोनुकुल असेच घडेल. केवळ भावंडांकडून थोडा मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. तसेच महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रहामुळे शारीरिक अनारोग्य व कुटुंबात वाद, भांडणे यांमुळे मानसिक त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. त्यामूळे या राशीच्या काहींना काही काळ नैराश्य येईल. महिन्याच्या पूर्वार्धात रवि ग्रहामुळे नोकरी-व्यवसायात लाभदायक घटना घडतील. मंगळामुळे महत्त्वाकांक्षा, मनोधैर्य वाढेल. कर्तबगारी दिसून येईल. मात्र वक्री बुधामुळे बुद्धी विकृत होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. नपेक्षा हातून नको तेच घडेल. जपा. शुक्रामुळे आर्थिक लाभ होतील व आर्थिक चिंता करावी लागणार नाही. कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. काहींना भूमिलाभ तर काहींना मान, प्रतिष्ठा प्राप्त होईल. गुरुमुळे प्रवास, यात्रा होतील; तर या राशीच्या लेखकांचे ग्रंथलेखन प्रसिद्ध होईल. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्रहकांकडूनच अपेक्षित आर्थिक लाभ होईल. केतु आरोग्यदायक असाच असेल. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या शनिमुळे दूरच्या प्रवासाचे योग येतील. शनि प्रतिकुल होणार नाही.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळींचे मन अतिशय कोमल झाले असले पाहिजे. त्यामुळे शीघ्र

मानसिक संवेदनांचा अनुभव येत असेल. अशा परिस्थितीत मनाविरुद्ध थोडेही काही घडले तरी मन लगेच उदास-निराश होत असेल. पण शुक्रामुळे ही स्थिती तात्पुरतीच असेल. शुक्र सर्व प्रकारचे सुखसमाधान देण्यास तत्पर राहील. आर्थिक लाभ होतील. कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रहाच्या अनुकुलतेमुळे शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना विविध प्रकारचे लाभ होतील. काहींना बढती, पगारवाढ तर काहींना उच्च पद, वरिष्ठांकडून प्रशंसा असे लाभ होतील. सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राहून सुखसमाधान लाभेल. गुरुमुळे कुटुंबात शुभ घटना घडतील. व्यावसायिक प्रगती  व वाढ होईल आर्थिक लाभ होतील. पण मंगळामुळे आर्थिक जबाबदाऱ्यांचे ओझेच वाहावे लागेल. शारीरिक उष्णता भडकून घसा, दाढा, मान यांची दुखणी सहन करावी लागतील. काहींना डोळ्याच्या अनारोग्यास सामोरे जावे लागेल. आर्थिक देणे द्यावे लागेल; पण येणे मात्र वसूल होणार नाही. हर्षलमुळे बोलणे फ़टकळ असे होईल, विक्षिप्त आचरण घडेल. अविचाराने खर्च होणार नाही यासाठी कटाक्षाने लक्ष द्यावे लागेल.  या राशीच्या अष्ट्म स्थानी असलेल्या शनिमुळे सतत अपेक्षाभंग होणाऱ्या घटना घडतील. त्यामुळे  मनाचा प्रक्षोभ होईल. या राशीच्या क्वचित कोणास मोठा आजार होण्याची शक्यता दिसते.  जपा.

**(१२) मीन**  - सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव अतिशय अस्थिर, लहरी, चंचल असा झाला आहे. शिवाय बाह्य दडपण या मंडळींना सहन होत नसावे. विशेष करून या राशीची लहान मुले अत्यंत व्रात्य, द्वाड अशा आचरणाची असावीत असे वाटते. त्यामुळे या राशीच्या मंडळींना मानापमान फ़ार असल्यामुळे सतत संतापजनक घटनाच सहन कराव्या लागत असतील. व त्यांचा असह्य मनस्ताप सहन करावा लागत असेल. स्वभाव हट्टी, हेकट झाला असल्यास शारीरिक त्रास, दगदग सहन करावी लागत असेल. त्याचा शारीरिक, मानसिक आरोग्यावर परिणाम होत असेल. त्यामुळे काहींचा रक्तदाब वाढून थकल्यासारखे वाटत असेल. हृदयविकार असणारांनी मन व बुद्धी अतिशय शांत ठेवण्याचा कसोशीने प्रयत्न केला पाहिजे. महिन्याच्या उत्तरार्धात शारीरिक उष्णता भडकून डोळ्याचे अनारोग्य सहन करावे लागण्याची शक्यता दिसते. या राशीच्या काहींना कुसंगतीची बाधा लागणे संभवते. जपा. नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने काळ अनुकुल होईल. पण जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे वैवाहिक जीवनातील सुख मिळणे कठिण होईल. पटवून घेण्याचा स्वभाव नसल्यामुळे या राशीच्या मंडळींना गृहसौख्य लाभणे कठिण दिसते. गुप्त पोलीसखात्यात काम करत असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल.

- ---ooo----

-